प्रेस नोट दिनांक १२/०१/२०१८

आज दिनांक १२/०१/२०१८ रोजी दुपारी १६.०० ते १७.२० वाजनेचे दरम्यान पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर आर.एस.पी.शेड येथे मा. पोलीस आयुक्त सो,पुणे शहर यांचे हस्ते पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे हद्दीतील पोलीस स्टेशन अंतर्गत दाखल असणारे जबरीचोरी/ घरफोडी चोरी व इतर गुन्हयातील चोरीस गेलेले हिरे/सोने/चांदीचे दागिने पोलीस स्टेशन तसेच गुन्हे शाखेकडील पोलीसांनी हस्तगत केलेले असून, हस्तगत करण्यात आलेल्या हिरे/सोने/चांदीचे दागिने फिर्यादी यांना पुनः प्रदानाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात येवून त्यामध्ये एकूण ७३ फिर्यादी यांना ७३ गुन्हयांतील सुमारे ३ किलो ५६२.६६ ग्रॅम सोन्याचे दागिने,७२६ ग्रॅम चांदीचे दागीने व रोख रक्कम असा कि.रु.१,०१,०८,३०३/- (एक करोड, एक लाख आठ हजार, तीनशे तीन रुपये.) रुपये किंमतीचा मुद्देमाल परत करण्यात आला आहे.

सदर कार्यक्रमास श्री रविंद्र कदम सो,पोलीस सह आयुक्त,पुणे शहर, श्री प्रदीप देशपांडे सो, अपर पोलीस आयुक्त सो गुन्हे,पुणे शहर, श्री रविन्द्र सेनगांवकर सो अपर पोलीस आयुक्त सो दक्षिण प्रादेशीक विभाग,पुणे श्री. साहेबराव पाटील सो, अपर पोलीस आयुक्त सो, प्रशासन विभाग,पुणे तसेच सर्व पोलीस उप आयुक्त, सहा.पोलीस आयुक्त व पुणे शहरातील सर्व पोलीस ठाणेकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, व गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक तसेच ७३ गुन्हयांतील फिर्यादी हे उपस्थित होते तसेच इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.


Pune Police
पुणे शहर पोलीस आयुक्तालय
मुद्देमाल पुनःप्रदान
* कार्यक्रम *
शुक्रवार दि.१२/०१/२०१८ रोजी १६/०० वा
मा.रविंद्र कदम
(पोलीस सहआयुक्त, पुणे शहर)











